# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

**दूरध्वनी : (०२२)२२१५ १८४७, फॅक्स : (०२२)२२१५१८६७. ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in**

## -: जाहिरात :-

**विषय :- महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुख्यालय मुंबई येथे " कार्यालयीन सहाय्यक " या पदांकरीता कंत्राटी तत्वावर नियुक्ती.**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, कफ परेड, मुख्यालय, मुंबई येथे विविध विभागात **" कार्यालयीन सहाय्यक "** च्या एकूण **१०** पदाकरीता पात्र व इच्छुक महिला / पुरूष उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी खालील लिंकवर जाऊन **दि. १०.१०.२०२२** रोजी सांय. ०५.०० पर्यत अर्ज सादर करावेत.

**APPPY ONLINE** ➡ https://forms.gle/u1bmnb8QJt2MUkGV6

सविस्तर जाहिरात व अधिक माहिती करिता www.mahasecurity.gov.in व maharashtra.gov.in वेबसाईटला भेट द्यावी.

या प्रक्रिये संदर्भातील अंतीम निर्णय महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचा राहील.

**Sd/-**

**पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक**

**महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.**

Rojgar Marathi.com

## १) <u>परिचय :-</u>

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे शासनाचे वैधानिक महामंडळ, आहे. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामार्फत केंद्र व राज्य शासनाची कार्यालये, त्यांचे उपक्रम, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, शासकीय किंवा निमशासकीय संस्था याद्वारे याबाबतीत स्वतंत्र तरतुदी करून निर्माण केलेले मोठे पुल, विशेष आर्थिक क्षेत्रे, खाजगी बंदरे व लहान धक्के, धरणे व द्रुतगती मार्ग इत्यादी पायाभुत सुविधांना आणि मॉल्स, मल्टिप्लेक्स, क्लब, हॉटेल इत्यादी यांसह वाणिज्यिक आस्थापनांना, सक्षम प्राधिकारी यांनी केलेल्या विशेष विनंतीवरून सुसज्जय मनुष्यबळामार्फत व्यावसायिक सेवा पुरवून त्यांचे अधिक चांगले संरक्षण करण्यासाठी व त्यांना सुरक्षा पुरविण्यासाठी अशा आस्थापनांना व संस्थांना तंत्रविषयक सल्ला देण्याकरीता मनुष्यबळामार्फत सुरक्षा व संरक्षण पुरविणे हे महामंडळाचे प्रमुख उद्दिष्टे आहे

महामंडळाच्या मुख्यालयातील विविध विभागात "**कार्यालयीन सहाय्यक**" एकूण **१०** पदासाठी प्रस्तुत जाहिरात देण्यात येत असून इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**<u>पदाचे नाव :- "कार्यालयीन सहाय्यक" कंत्राटी तत्वावर १० पदे (प्रशासन, आस्थापना, प्रतिष्ठापना, भरती, प्रशिक्षण इ. विभागासाठी ) खालील प्रमाणे किमान अर्हता आवश्यक आहे.</u>**

**१. <u>एकूण पदे</u> :- १०**

**२. <u>वय</u> :-** ३०.१०.२०२२ रोजी ३५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

**३. <u>नोकरीचे ठिकाण</u> :- महामंडळाचे मुख्यालय, मरासुम, मुंबई.**

**४. <u>वेतन</u> :- २५,०००/-**

**५. <u>शैक्षणिक पात्रता</u>** :-

१. उमेदवार हा कोणत्याही विषयातील किमान पदवीधर / उच्च पदवीधर असावा.
२. उमेदवार मराठी टायपिंग ३० श.प्र.मि. व इंग्रजी टायपिंग ४० श.प्र.मि. GCC ची शासनमान्य परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
३. उमेदवार MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक असून त्यास संगणकावरील MS Word / Excel चे ज्ञान असणे आवश्यक आहे.
४. कार्यालयीन सहाय्यक / क्लर्क / टायपिस्ट या पदाचा खाजगी किंवा निम शासकीय / शासकीय आस्थापनामध्ये किमान ०३ वर्षाचा कामकाजाचा अनुभव आवश्यक आहे.

Rojgar Marathi.com

## २) अर्ज सादर करण्याची पध्दत :-

१. इच्छूक व पात्र उमेदवार https://forms.gle/u1bmnb8QJt2MUkGV6 या लिंकवर जाऊन आपला अर्ज सादर करावा. तसेच अर्ज सादर केल्यानंतर त्याची पोचपावती (Acknowledgment) **empanelment.mssc@gmail.com** या ई - मेल आयडी वर पाठवावेत.

**अर्ज सादर करण्याची शेवटची मुदत :-**

अर्ज सादर करण्याची शेवटचा दिनांक :- **१०.१०.२०२२ पर्यत वेळ १८.०० वाजेपर्यंत.**

## ३) मुलाखतीसाठी हजर रहावयाचे ठिकाण व दुरध्वनी क्र. :-

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

दूरध्वनी : (०२२) २२१५ १८४७, फॅक्स :(०२२) २२१५१८६७.

## ४) मुलाखतीवेळी उमेदवारांनी सादर करावयाची कागदपत्रे :-

१) वैयक्तिक माहिती (BIO-DATA)

२) शैक्षणिक कागदपत्रे.

३) Tally Certificate

४) अनुभव प्रमाणपत्र

५) ०२ पासपोट साईज आकाराचे फोटो / पॅन कार्ड / आधार कार्ड.

## ६) निवड प्रक्रिया :-

१. उमेदवारांच्या प्राप्त कागदपत्रानुसार मुलाखतीसाठी बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल. किमान अर्हता प्राप्त उमेदवारांना मुलाखतीची वेळ दिनांक याबाबत भ्रमणध्वनी तसेच ई-मेलव्दारे कळविण्यात येईल.

२. उमेदवारांची महामंडळाचे कार्यालयात मराठी व इंग्रजी टायपिंग (ISM Software) पत्रलेखन, नस्ती लेखन तसेच Word, Excel, इ. बाबत संगणकावर परिक्षा घेण्यात येईल. परिक्षेनंतर उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

Rojgar Marathi.com

३. लेखी परिक्षा, मुलाखत, अनुभव इ. वर आधारित उमेदवारांची नामिकासुची (प्रतिक्षाधीन यादी) तयार करण्यात येईल आणि महामंडळात उपलब्ध जागेनुसार या सुचीमधील गुणानुक्रम विचारात घेऊन नियुक्ती दिली जाईल.

४. निवडलेल्या उमेदवारास महामंडळाच्या अटी व शर्तीसह नियुक्ती पत्र दिले जाईल.

५. दिली जाणारी नियुक्ती ही करार पध्दतीने कंत्राटी तत्वावर ०१ वर्षासाठी असेल व महामंडळाची आवश्यकता आणि प्रस्तुत कर्मचाऱ्यांची क्षमता, आत्मसात केलेले ज्ञान व इतर निकष यानुसार करार नुतनीकरण करण्यात येईल.

**७) इतर सुचना :-**

१. मुलाखतीसाठी उमेदवारांना स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

२. प्रस्तुत जाहिरातीत नमुद करण्यात आलेली पदसंख्या यामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

३. सदर निवड प्रक्रिया कोणत्याही वेळी / कोणत्याही कारणास्तव / कोणत्याही टप्प्यावर / पुर्णत: किंवा अंशत: रद्द करण्याचा / फेरबदल करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

४. उमेदवारांच्या नेमणुकीबाबत अंतिम निर्णय महामंडळाचा असेल.

Rojgar Marathi.com

**Sd/-**
**पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.**